# वसंतदादा पाटिल महाविद्यालय,पाटोदा

## शिक्षक-पालक-विद्यार्थी समन्वय समिति अहवाल

५ सप्टेम्बर २०२२ रोजी महाविद्यालयात शिक्षक पालक व् विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.आबासाहेब हांगे होते .सर्वप्रथम सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली ,या कार्यक्रमात अनेक विध्यार्थी यांनी शिक्षक दिनानिमित्त आपले मनोगत व्यक्त केले.

अथिती म्हणून महाविदायाल्याचे माझी विद्यार्थी असलेले नांदेड येथे कार्यरथ सहाय्यक वाहन निरीक्षक नितीन राख यांनी आपले मनोगत व्यक्त केले त्यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व विशद करत ,केंद्रीय लोकसेवा आयोग , व विविध स्पर्धा परीक्षा या वरती मार्गदर्शन केले.दुसरे अतिथी संदीप जाधव 'महाविद्यालय विकास समिती सदस्य यांनी आपल्या जीवनातील काही आठवणीना उजाळा देत आपिये मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप प्राचार्य आबासाहेब हंगे यांनी केला ,आपल्या मार्गदर्शनात त्यांनी शिक्षक दिनाचे महत्व सांगून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले शिक्षक व विद्यार्थी यांचे नाते दृढ असणे आवश्यक आहे ,यामधून विद्यार्थी यांचा विकास होऊ शकतो ,पर्ययाने देशाच विकास झाल्या शिवाय राहणार नाही असे मत व्यक्त केले.

पालका मधून प्रतिनिधी स्वरुपात प्रा .कावेरी खुरणे यांनी विचार व्यक्त केले .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.जयंत साठे यांनी केले.प्रस्ताविक डॉ बळीराम राख यांनी केले .आभार प्रदर्शन प्रा.कुशाबा साळुंके यांनी केले .मेळाव्यास विध्यार्थी पालक व शिक्षक बहु संखेने उपस्थित होते.

प्राचार्य

**Principal**
Vasantdada Patil Arts, Comm. &
Science College, Patoda, Dist.Beed.




**CHIEF GUEST MR. NITIN RAKH, ASSTT. RTO NANDED DELIVERING SPEECH ON STUDENTS-TEACHERS-PARENTS GATHERING**




**PRINCIPAL PROFESSOR ABASAHEB HANGE GUIDING AT STUDENTS-TEACHERS-PARENTS GATHERING**

दैनिक लोकाशा
महाराष्ट्राच्या मनाचा नकाशा
06SEP2022

# विद्यार्थी व शिक्षकाचे नाते दृढ असणे आवश्यक -प्राचार्य आबासाहेब हांगे

पाटोदा, दि.६ (लोकाशा न्युज):- विद्यार्थी हा आयुष्यातील फार मोठा काळ त्याच्या शिक्षकाच्या सानिध्यात ज्ञानगृहण करत असतो. त्याचे पालकांशी नाते तर असतेच परंतु विद्यार्थ्याचे शिक्षकासोबत दृढ नाते असल्याशिवाय विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होऊ शकत नाही तसेच विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांची व शिक्षकांची ओळख करून दिली पाहिजे जेणेकरून तिन्ही घटकांमध्ये समन्वय व सुसंवाद साधणे शक्य होऊन विद्यार्थ्यांचा विकास साध्य करण्यास मदत होईल असे प्रतिपादन प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांनी केले. येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिनानिमित्य आयोजित 'विद्यार्थी-शिक्षक-पालक' मेळाव्यात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी असलेले नांदेड येथे कार्यरत सहाय्यक वाहन निरीक्षण नितीन राख होते. दुसरे प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालय विकास समितीचे सदस्य तथा माजी नगरसेवक संदीप जाधव होते. व्यासपीठावर उपप्राचार्य प्रोफेसर किशोर मचाले, पदव्युत्तर विभाग संचालक डॉ.क प्रा.अनिल जोगदंड आदि उपस्थित होते. कार्यक्रमात सर्वप्रथम डॉ.



सर्वपल्ली राधाकृष्णन व कै.सौ.केशरबाई क्षीरसागर यांच्या प्रतिमांचे पूजन व पुष्पमाल्यार्पण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविकात माजी विद्यार्थी व पालक समन्वय संघाचे अध्यक्ष डॉ. बळीराम राख यांनी मेळाव्याच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. यानंतर पालकांमधून प्रातिनिधिक स्वरूपात प्रा.कावेरी खुरणे यांनी मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांमधून भाग्यश्री नागरगोजे, ईश्वरी सुसलादे, ज्योती वाळेकर, आरती वाळेकर, रुपाली डोके, अमोल साबळे या विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. जयंत साठे यांनी केले. आभारप्रदर्शन सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. कुशाबा साळुंके यांनी केले. मेळाव्यास विद्यार्थी, पालक व शिक्षक बहुसंख्येने उपस्थित होते.

झुंजार नेता
Wed 07 09 2022
Page No. 3
झुंजार नेता
दिनांक : ७ सप्टेंबर २०२२ वार : बुधवार

सोयाबीनवर लष्कर अळीचा प्रादुर्भ

# विद्यार्थी व शिक्षकाचे नाते दृढ असणे आवश्यक-प्रा.आबासाहेब हांगे

